Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: ३० ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार २३ ऑक्टोबर २०१८ ते सोमवार २९ ऑक्टोबर २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ | पालिका रुग्णालयात औषधांचा तुटवडा कायम

गिरीराज सिंहांनी मुस्लिमांना दिली धमकी | ४

## रक्ताळलेले ‘अच्छे दिन’; उद्धव ठाकरेंची सरकारवर खरमरीत टीका



**मुंबई (विशाल कारंडे)-** रावण दहनाच्या कार्यक्रमावेळी अमृतसरमध्ये झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने केंद्र सरकारला धारेवर आहे. विकास आणि प्रगतीच्या गोष्टी आम्ही करतो, पण रेल्वे यंत्रणा साफ भंगारात गेली आहे. सिग्नल यंत्रणा, तडे गेलेले रूळ, वेळापत्रक सुविधा यांची बोंब असताना राज्यकर्ते ’बुलेट ट्रेन’च्या नावाने दांडिया खेळतात याचे आश्चर्य वाटते, असा टोला शिवसेनेने मुखपत्र असलेल्या ‘सामना’तील अग्रलेखातून लगावण्यात आला आहे. या अग्रलेखात शिवसेनेने रेल्वेमंत्री पीयुष गोयल यांच्यावरही अप्रत्यक्षपणे शरसंधान साधण्यात आले आहे. रेल्वेचे खाते म्हणून जो काही पसारा आहे, त्याचे नक्की काय चालले आहे? कुणाला कुठेतरी कामधंद्याला चिकटवून टाकायचे अशा पद्धतीने महत्त्वाच्या खात्यांवर मंत्री म्हणून लोकांना चिकटवले आहे. त्यांचा सारा वेळ पक्षाची वकिली करण्यातच जातो, अशी टीका शिवसेनेने केली आहे. याशिवाय, शिवसेनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्पावरही टीका केली. देशात माणसे किड्यामुंग्यांसारखी मरत आहेत. मात्र, राजकीय पक्ष एकमेकांना दोष देण्यात मग्न आहेत. गोरखपूरच्या सरकारी इस्पितळात प्राणवायूअभावी शंभर बालके दगावली ही मनुष्यचूक तशीच अमृतसरचा रेल्वे अपघात ही मनुष्यचूक आहे.

## मोदींनी सीबीआयला राजकीय हत्यारासारखे वापरले- राहुल गांधी

**नवी दिल्ली (सुनील आढाव)-** केंद्रीय गुन्हे अन्वेषण (सीबीआय) विभागाचे विशेष संचालक राकेश अस्थाना यांच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर हल्ला चढवला. सीबीआय म्हणजे सरकारकडून राजकीय सूड उगवण्यासाठी वापरले जाणार शस्त्र असल्याची टीका त्यांनी केली.राहुल यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले. त्यांनी म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मर्जीतले असणारे गुजरात केडरचे अधिकारी राकेश अस्थाना सीबीआयमधील दुसऱ्या



क्रमांकाचे अधिकारी होते. आता त्यांच्यावर लाचखोरीचे आरोप करण्यात आले आहेत. पंतप्रधान मोदींच्या काळात सीबीआय म्हणजे राजकीय हत्यार झाले आहे. अगोदरच रसातळाला पोहोचलेल्या या संस्थेत आता अंतर्गत युद्ध सुरु झाल्याचे राहुल यांनी म्हटले. राकेश अस्थाना हे १९८४ च्या गुजरात केडरचे अधिकारी आहेत. गोध्रा येथे २००२ साली साबरमती एक्स्प्रेस जाळण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास अस्थाना यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला होता.

## कोल्हापुरात भाजपला मोठा धक्का, नगराध्यक्षपद काँग्रेस आघाडीकडे

**कोल्हापूर-** कोल्हापूरमध्ये भाजपला मोठा धक्का बसला आहे. नगराध्यक्षपदी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा उमेदवार विजयी झाला आहे तर भाजपचे



पृथ्वीराज यादव पराभूत झाले आहे.कोल्हापूर जिल्ह्यात नव्याने स्थापन झालेल्या शिरोळ नगर परिषदेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीचा आज निकाल लागला. यात भाजपचा दारूण पराभव झाला आहे. १७ पैकी ९ जागांवर शाहू आघाडीचे उमेदवार निवडून आलेत, तर ७ जागांवर भाजपला समाधान मानाव लागलंय तर एक जागी अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत. अमर माने यांची नगराध्यक्ष पदी निवड झाली आहे.कोल्हापुरात शिरोळ नगरपरिषदेसाठी चुरशीची लढाई पाहायला मिळाली. काल झालेल्या मदतानात ८० टक्के मतदान करण्यात आलं. या निकालाची उत्सुकता संपूर्ण जिल्ह्यात होतीच तर अनेक राजकीय पक्षांची प्रतिष्ठा या निवडणुकीच्या निमित्ताने पणाला लागली होती.आज शिरोळ नगर परिषदेच्या मतदानाची मतमोजणी झाली. नगराध्यक्षपदासाठी सहा आणि नगरसेवक पदाच्या १७ जागांसाठी ८३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

## ट्रेनची धडक बसण्यापूर्वी वडिलांनी लहान मुलाला हवेत फेकले

**अमृतसर (दिलीप सिंग)-** रावण दहनाच्या कार्यक्रमावेळी अमृतसरमध्ये झालेल्या भीषण रेल्वे अपघातामध्ये नातेवाईकांना गमावल्यामुळे अनेकांचे जीवन उद्धवस्त झाले आहे. अशा अनेक करुण कहाण्या आता समोर येत आहेत. यामध्ये अवघ्या दहा महिन्यांच्या विशालची कहाणी अनेकांच्या हृदयाला चटका लावून जात आहे. रावण दहनाच्या या कार्यक्रमाला लोकांनी प्रचंड गर्दी केली होती. यामध्ये ५५ वर्षांच्या मीना देवीही रेल्वे रुळापासून दूर काही अंतरावर गर्दीत उभ्या होत्या. सर्वजण रावण दहनाचा सोहळा पाहण्यात मग्न असतानाच मीना देवी यांना समोरून एक्स्प्रेस गाडी धडाडत येताना दिसली.पुढच्याच क्षणी मीना देवी यांच्यासमोर असलेल्या माणसाला गाडीची धडक बसली. मात्र, त्यापूर्वी त्याने



स्वतःच्या हातातील लहान मुलाला हवेत फेकले. अवघ्या काही सेकदांमध्ये ट्रेन त्याला चिरडून निघून गेली. याचवेळी मीना देवी हवेत फेकलेल्या चिमुरड्याला पकडण्यासाठी पुढे सरसावल्या. त्यांनी या मुलाला कसेबसे झेललेही, मात्र त्याचे डोके जमिनीवर आपटले. परंतु, मीना देवी यांनी त्याला फारशी दुखापत होऊ दिली नाही. यानंतर मीना देवी या चिमुरड्याला आपल्या घरी घेऊन गेल्या. अपघातामध्ये या मुलाचे पालक मारले गेले असतील तर मुलाचा सांभाळ करण्याची तयारीही मीना देवी यांनी दाखविली होती.मात्र, पोलिसांनी शोध घेऊन या मुलाच्या घरच्यांना शोधून काढले. चौकशीअंती या लहानग्याचे नाव विशाल असून तो दहा महिन्यांचा असल्याची माहिती पुढे आली. विशालवर सध्या स्थानिक रुग्णालयात उपचार सुरु आहे.

## मुंबईत अनधिकृत बांधकाम, महापालिका म्हणते, आम्हाला माहित नाही!

**मुंबई (सम्यक कासारे)-** मुंबईतील अनधिकृत बांधकामांप्रकरणी मुंबई महानगरपालिकेचा अजब कारभार समोर आला आहे. मुंबई महापालिकाला आपल्या क्षेत्रांतील अनधिकृत बांधकामांचीच माहिती नसल्याचं समोर एका आरटीआयच्या माध्यामातून समोर आलं आहे.



शिवसेना नगरसेविका अरुंधती दुधडवकर नगरसेविका राहत असलेल्या ठिकाणी हे अनधिकृत बांधकाम असल्याचे उघडकीस आले आहे. या अनधिकृत बांधकामाविषयी माहिती आरटीआयच्या माध्यामातून संजय दुबे यांनी मागवली होती. मात्र याची कोणतीही माहितीच पालिकेला नसल्याचे समोर आलं आहे.माजी नगरसेवक अरविंद दुधवडकर आणि आजी नगरसेविका अरूंधती दुधवडकर यांचे ताडदेव येथील दिपक अपार्टमेंट, सुपारीवाला इमारतीत घर आहे. ताडदेव टॉवरजवळील वॅलेंटाईन स्पोर्टस् क्लबला लागून एक वाढीव बांधकाम करण्यात आले आहे. हे वाढीव अनधिकृत बांधकाम कोणतीही परवानगी न घेता करण्यात आले आहे. दुधवडकर यांनीच क्लबच्या मोकळ्या मैदानावरील संरक्षक भिंतीवर अतिक्रमण करत बांधकाम केले असल्याचा आरोप केला जातोय.

## नगर-पुणे मार्गावर भीषण अपघात, आठ जणांचा जागीच मृत्यू

**अहमदनगर (हर्षद परब)-** भीषण अपघातात आठ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना अहमदनगर – पुणे मार्गावर घडली आहे. अहमदनगर-पुणे मार्गावर वाडेगव्हाणजवळील ही घटना आहे, ज्यात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. तर तीन जणांचा रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाला. मृतामध्ये एका लहान मुलाचाही समावेश आहे.औरंगाबादहून पुण्याला जाणाऱ्या खाजगी बसने उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिली. ड्रायव्हरचा बसवरील ताबा सुटल्याने अपघात झाला असल्याचं बोललं जात आहे. पहाटे साडे पाच वाजताच्या सुमारास ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरु केलं.

## #MeToo : अत्याचार होतो तेव्हाच आवाज का उठवत नाही, सिंधुताईंचा सवाल

**अहमदनगर (वसंत लोखंडे)-** सध्या भारतात #MeToo या लैंगिक शोषणाविरुद्धच्या मोहिमेचं वादळ सुरु आहे. अनेक क्षेत्रातील महिला आपल्यावर झालेल्या लैंगिक अत्याचारावर बोलत आहेत. पण अत्याचार झाला तेव्हाच का बोलत नाही, असा सवाल अनाथांची माय सिंधुताई सपकाळ यांनी केला आहे.अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील लाड जळगाव येथे उत्कर्ष या मल्टिस्टेट पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त सिंधूताई सपकाळ आल्या असताना त्यांना मी टू मोहिमेवर प्रश्न विचारण्यात आला. यावेळी अत्याचार होतो त्याचवेळी याविरोधात आवाज उठवण्याचं आवाहन त्यांनी केलं.१० वर्षांनंतर



असे आरोप करणं हे चुकीचं आहे. काळजात कळ उठते तेव्हा माणूस गप्प राहू शकत नाही. त्यामुळे जेव्हा अत्याचार झाला तेव्हाच आवाज उठवत का नाही? अत्याचारासाठी शिक्षा ही ठरलेली आहे, असं त्या म्हणाल्या.या प्रकरणांमुळे जे दोषी नाहीत त्यांना सुद्धा शिक्षा भोगावी लागत आहे.

## राजस्थानमध्ये आतापर्यंत १२३ जणांना झिका व्हायरसची लागण

**जयपुर (केदार वाजे)** – राजस्थानमधील जयपूर जिल्ह्यात रविवारी झिका व्हायरसच्या आणखी सहा केस समोर आल्या आहेत. त्यामुळे झिकाची लागण झालेल्या रुग्णांची एकूण संख्या १२३ वर पोहोचल्याची माहिती सरकारी अधिकाऱ्याने दिली. उपचारानंतर १२३ पैकी १०५ रुग्ण बरे झाल्याचंही या अधिकाऱ्याने सांगितलं.राज्य आरोग्य विभागाने तपासणी, पडताळणी आणि पहिल्या तिमाहीतील झिका प्रभावित गर्भवती महिलांसाठी पाच सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. वेळोवेळी या समितीकडून आरोग्य संचालकांना अहवाल सादर करण्यात येईल, असं एका आदेशात म्हटलं आहे. जयपूरमधील शास्त्रीनगर भागातून झिकाचे जास्त प्रकरणं समोर आले आहेत. सरकारी पातळीवर झिका रोखण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरु आहेत. हा व्हायरस एडीज इजिप्टी मच्छरापांसून



पसरतो, ज्यामुळे ताप, त्वचेवर सुरकुत्या, डोळ्यांना त्रास आणि शरीर, डोकेदुखीचा त्रास होतो. गर्भवती महिलांना याचा सर्वात जास्त त्रास होतो. भारतात सर्वात अगोदर हा आजार जानेवारी २०१७ मध्ये समोर आला होता. यानंतर त्याच वर्षी जुलैमध्ये तामिळनाडूत कृष्णागिरी जिल्ह्यात दुसरा रुग्ण आढळून आला होता. गंभीर निगराणी आणि मच्छरांवर नियंत्रण मिळवल्यानंतर हा व्हायरस आटोक्यात आला होता.

## जेजुरीत प्रकाश आंबेडकर आणि राजू शेट्टी एकाच व्यासपीठावर

**पुणे (अभिजीत येरल्लु)-** विधानसभा आणि लोकसभा निवडणुका काही महिन्यांवर येऊन ठेपल्या असताना, राज्यात राजकीय समीकरणं जुळवण्यास सुरुवातही झालीय. अशात ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी एमआयएमसोबत जात, बहुजन वंचित विकास आघाडी स्थापन केलीय. त्यामुळे विरोधकांच्या एकजुटीला सुरुंग लागला आहे. दुसरीकडे, शेतकरी नेत्यांमधील महत्त्वाचे नेते खासदार राजू शेट्टी हे गेल्या काही महिन्यात काँग्रेसच्या जवळ जाताना दिसले. अशा वातावरणात ॲड. प्रकाश आंबेडकर आणि खासदार राजू शेट्टी हे जेजुरीतील दसरा मेळाव्याच्या निमित्ताने एकाच व्यासपीठावर आले. आगामी काळात प्रभावी ठरणारे असे दोन नेते एकाच व्यासपीठावर आल्याने अर्थात राजकीय वर्तुळात चर्चांनाही सुरुवात झाली. दोन्ही नेत्यांनी आपापल्या भाषणातून भूमिकाही स्पष्ट केली.सत्ता हस्तगत केल्याशिवाय सर्वसामान्यांना न्याय मिळणार नाही. त्यामुळे एमआयएमशी युती केल्याने त्याचा अपप्रचार केला जातोय, असे म्हणत प्रकाश आंबेडकर यांनी बहुजन वंचित विकास आघाडीवर टीका करणाऱ्यांना उत्तर दिले.कुपोषण थांबलेले नाही, आदिवासी भागात मुलं दगावत आहेत, धान्य गोदामात भरले आहे, मात्र ते धान्य सडून गेले तरी चालेल पण ते कुपोषणीत कुटुंबाला आम्ही ते धान्य देणार नाही, असे सध्याच्या सरकारचे



ब्रिद वाक्य झाले आहे, मग ते सरकार काँग्रेस, शिवसेना किंवा भाजपचे असो, असे म्हणत प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले, ‘तव्यावरील भाकरी पलटली पाहिजे. पण ती पलटताना वंचितांच्या हातामध्ये सत्ता गेली पाहिजे, हे लक्षात ठेवा. नाहीतर ही सत्ता नेहमीप्रमाणे या कुटुंबाकडून दुसऱ्या कुटुंबाकडे जातेय. त्यामुळे वंचितानी एकत्र येउन भाकरी पलटली पाहिजे.’ ‘बारामतीमध्ये घोषित केलं, आरक्षण देऊ, पण ते कुठे गेलं? टाटा इंस्टीट्युटमार्फत धनगरांचे आरक्षण संपवले, अशी आजची परिस्थिती आहे. अहवाल तुमच्या विरोधात आला, आता आम्ही काहीच करु शकत नाही, असे सांगत आहेत.

### सौजन्य व्हॉट्सअप



## २०१९ साठी भाजपकडून धोनी आणि गंभीर मैदानात?

**मुंबई (अमोल गुडेकर)-** क्रिकेटचं मैदान गाजवणारे भारतीय क्रिकेट संघाचे दोन दिग्गज क्रिकेटपटू आता राजकारणाचं मैदान गाजवण्याची शक्यता आहे. हे दोन्ही खेळाडू २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. ‘टाइम्स नाऊ’ने हे वृत्त दिलं आहे.आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने आतापासूनच तयारीला सुरुवात केली आहे. भाजपने असा डाव खेळला आहे, ज्यामुळे विरोधकांना थोडी धास्ती वाटू शकते.

पक्षांच्या सूत्रांच्या माहितीनुसार, भारताचे क्रिकेटपटू



गौतम गंभीर आणि महेंद्रसिंह धोनी आगामी निवडणुकीसाठी भाजपचे उमेदवार म्हणून मैदानात उतरु शकतात. असं झालं तर भाजपला याचा बंपर फायदा मिळू शकतो. गौतम गंभीरकडे मीनाक्षी लेखी यांच्याजागी दिल्लीच्या राजेंद्रनगर लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी सोपवली जाऊ शकते. भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याने नुकतंच म्हटलं होतं की, ’मीनाक्षी लेखींच्या कामावर मतदारसंघातील जनता फार खुश नाहीत. पक्षाने विचार करुन असा निर्णय घेतला आहे की, यंदा मीनाक्षी लेखींना उमेदवार म्हणून निवडणुकीत उतरवणार नाही.

## चीनने बनवला मुंबईसारखा सी लिंक, जगातील सर्वात मोठा पूल,

**चीन (हिंदुस्थान समाचार)-** जपान, चीन हे देश विकास कामांमध्ये आपल्या देशाच्या खूप पुढे आहेत. चीनची सरकारी वृत्तसंस्था झिंहुआने दिलेल्या माहितीनुसार पर्ल रिवर एस्चुरीच्या जलक्षेत्रावर बनवलेला ५५ किलोमीटर लांबीचा हा पूल जगातील सर्वात लांब पूल आहे. हॉंगकॉंग-जुहाई-मकाऊला जोडणाऱ्या पुलाचे २४ ऑक्टोबरला उद्घाटन केलं जाणार आहे. पूल बांधल्यामुळे हॉंगकॉंग आणि मकाऊला येण्या-जाण्यासाठी लागणारा वेळ कमी होणार आहे. रोज जवळपास ४०,००० हून जास्त वाहनं यावर प्रवास करणार असून यात बसेस, कंटेनर यांचा समावेश असणार आहे. चीनचा हा सर्वात मोठा ट्रान्सपोर्ट प्रकल्प आहे. या



प्रकल्पासाठी अंदाजे ४८०७ कोटी युआन खर्च झाल्याचं समजलं आहे. युआन हे चीनचे चलन आहे. भारताच्या चलनाप्रमाणे ४८,०७० कोटी इतका खर्च या प्रकल्पासाठी करण्यात आला आहे.चीन वृत्तसंस्थेच्या बातमीनुसार या पुलाच्या बांधकामासाठी स्टीलचा वापर करण्यात आला आहे. एकूण ४,२०,००० टन स्टीलचा वापर करण्यात आला आहे.

## थोडक्यात महत्वाचे

### मुलांच्या लग्नाचं वय १८ वर्षे करण्याची मागणी सुप्रीम कोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली (सुनील आढाव)-** मुलाच्या लग्नाचं वय २१ वरुन १८ वर्षे करावं अशी मागणी करणारी जनहित याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली. या याचिकेमागे कोणताही योग्य हेतू नसल्याचं मत नोंदवत सुप्रीम कोर्टाने याचिकाकर्त्याला २५ हजार रुपयांचा दंडही ठोठावला.सरन्यायाधीश रंजन गोगोई, जस्टिस एस. के. कौल आणि जस्टिस के. एम.



जोसेफ यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळली आणि याचिकाकर्त्याला दंड ठोठावला. वकील अशोक पांडे यांच्याकडून ही याचिका दाखल करण्यात आली होती, ज्यात मुलाच्या लग्नाचं वय १८ वर्षे करावं, असं म्हटलं होतं.१८ वर्षे वयाच्या मुलाला मतदानाचा आणि सैन्यात भरती होण्याचा अधिकार आहे. मग २१ वर्षे वय पूर्ण होईपर्यंत लग्नासाठी थांबण्यात कोणताही मुद्दा नाही, असा दावा याचिकाकर्त्यांकडून करण्यात आला होता. दरम्यान, कोर्टाने याचिकाकर्त्याला यावर चांगलाच दणका दिला. ५० वर्षीय याचिकाकर्त्याने लग्नाचं वय १८ वर्षे करण्याची मागणी करण्याला अर्थ नाही. एखादा १८ वर्षीय मुलगा याच मागणीसाठी कोर्टात आल्यावर पाहू, असं मत कोर्टाने नोंदवलं. बालविवाह प्रतिबंधात्मक कायद्यानुसार मुलींच्या लग्नाचं वय कायद्याने १८ वर्षे, तर पुरुषांच्या लग्नाचं वय २१ वर्षे आहे.

### मी येणार म्हणून आठ दिवसात रस्ता झाला -चंद्रकांत पाटील

**कल्याण (अरुण तिवारी)-** गावात मंत्री येणार असले, की यंत्रणा कामाला लागते आणि रस्ते तयार होतात, अशी धक्कादायक कबुली राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे. काल कल्याणमध्ये झालेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते.चंद्रकांत पाटील हे काल कल्याणजवळच्या मुठवळ गावात आले होते. हावरे बिल्डर्सच्या गृहनिर्माण प्रकल्पाच्या चाव्या वाटपाच्या कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावली होती. यावेळी सुरेश



हावरे यांनी बोलताना चंद्रकांत दादा येणार म्हणून आठ दिवसात गावातला कच्चा रस्ता सिमेंटचा झाल्याचं सांगितलं. त्यावर चंद्रकांत दादांनीही उघडपणे मंत्री असल्याचे हे फायदे असल्याचं वक्तव्य केलं. 'मंत्री गावात येणार असले, की सूचना न देताही कामं होतात.. हावरेंनी सांगितल्याप्रमाणे आठ दिवसात गावातला रस्ता झाला.. मंत्री असल्याचे हेच फायदे असतात', असं वक्तव्य चंद्रकांत पाटील यांनी केलं.

### तनुश्रीचा राखीवर अब्रूनुकसानीचा दावा, दहा कोटींची मागणी

**मुंबई (हर्षद परब)–** अभिनेत्री तनुश्री दत्ताने क्षशऊदद मोहीमेअंतर्गत अभिनेता नाना पाटेकर यांच्यावर गैरवर्तनाचा आरोप केला होता. हे प्रकरण समोर आल्यानंतर अनेक मोठ्या कलाकारांनी तनुश्री दत्ताला पाठिंबा दिला होता. तर दुसरीकडे तिला विरोध करणारेही काही कलाकार होते. त्यापैकी एक राखी सावंतही होती. आता तनुश्री दत्ताने राखी सावंतविरोधात



अब्रूनुकसानीचा दावा ठोकला आहे.तनुश्री ड्रग्ज घेऊन तिच्या व्हॅनिटी व्हॅनमध्ये पडली होती. नाना पाटेकर आणि गणेश आचार्य यांच्या सांगण्यावरुन मला तिचं गाणं करावं लागलं होतं. त्यामुळे तनुश्री दत्ताने राखीवर मानहानीचा खटला दाखल केला आहे. सोबतच राखीकडे दहा कोटी रुपयांची मागणी केली आहे.तनुश्रीवर भाष्य करतानाचा राखी सावंतची एक मुलाखत व्हायरल झाली होती. राखी म्हणाली होती की, 'तनुने सिनेमातील गाणं अर्धवट सोडलं होतं. यानंतर कोरिओग्राफर गणेश आचार्य यांचा मला कॉल आला. तू सेटवर ये, गाण करायचं आहे, एवढंच गणेशने सांगितलं. मग मी तातडीने सेटवर पोहोचले.' या घटनेबद्दल सांगताना राखीने अनेकदा तनुश्रीसाठी अपशब्दांचा वापर केला होता.

# सोशल मीडियाच्या माध्यमातून रत्नागिरीतील युवकाची फसवणूक करत घातला लाखोला गंडा

**रत्नागिरी (योगेश होळंब)-** सोशल मीडियाच्या माध्यमातून एखाद्या अनोळखी व्यक्तीशी मैत्री करणे किती महागात पडू शकते, याचा प्रत्यय शहरातील एका प्रकरणात आला आहे. फेसबुकच्या मॅसेजर आणि व्हॉटसअॅपच्या माध्यमातून ओळख बनवून लंडनमधल्या एका तरुणीने शहरातल्या एका व्यापाऱ्याला तब्बल सव्वाचार लाखांचा गंडा घातला आहे. तवंगर जमादार झारी या व्यापाऱ्याची प्रिस्का विलियम्स नावाच्या तरुणीने ही फसवणूक केली आहे. शहरातील तवंगर जमादार झारी हे एक आंबा व्यापारी आहेत. सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला झारी यांना फेसबुकच्या मॅसेजरवर प्रिस्का विल्यम्स हिची फ्रेंड रिकवेस्ट आली. झारी यांनी ती स्वीकारली आणि युनायटेड किंगडममधल्या या तरुणीसोबत यांचे बोलणे सुरू झाले. प्रिस्का विलियम्स नावाने झारी यांच्या सोबत ही तरुणी एक महिना चॅटिंग करत होती. या दरम्यान प्रिस्का हिने झारी यांचा व्हॉटसअॅप नंबर मिळवला आणि व्हॉटसअॅपवर त्यांचे बोलणे सुरू झाले. लंडनमध्ये माझे ज्वेलरीचे दुकान आहे. मी आई वडिलांची एकुलती एक आहे,असे सांगत या दोघांचे बोलणे वाढले. प्रिस्का हिने झारी यांना आपण लंडनहून भारतात खरेदी करण्यासाठी आणि तुला भेटण्यासाठी येणार असल्याचे सांगितले. त्याचबरोबर झारी यांच्यासाठी लंडनमधून बुट,ज्वेलरी आणि इतर महागड्या वस्तू घेवून येत असल्याचेही ती त्यांना म्हणाली होती. एवढंच काय प्रिस्काने भारतात येत असल्याची खात्री पटण्यासाठी झारी यांना पुरावेही दिले. प्रिस्काने आपला



पासपोर्ट,विमानाचे तिकीट आणि बोर्डींग पास व्हॉटसअॅपवरुन झारी यांना पाठवला. झारी यांना प्रिस्का दिल्लीच्या एअरपोर्टवर आल्याचे सांगितले खरे; मात्र, परदेशातून आलेल्या प्रिस्काला विमानतळावर अडवले गेल्याचे भासवण्यात आले. प्रिस्काने झारी यांना फोन करून विमानतळावर कस्टम विभागाने अडवल्याचे सांगत तुझ्यासाठी घेवून येणाऱ्या महागड्या वस्तूंवर कस्टम ड्युटी भरली नसल्याने अडचणीत आल्याचे भासवले. तसेच झारी यांचा विश्वास बसावा म्हणून बनावट अधिकाऱ्यांशी बोलणेही करुन देण्यात आले. आणलेल्या वस्तूंची कस्टम ड्युटी भरण्यासाठी माझ्याकडे केवळ १ लाख रुपयेच आहेत. मात्र, आणखी ६५ हजार रुपयांची गरज असल्याचे प्रिक्साने सांगितले. त्यानंतर झारी यांनी विश्वास ठेवून पहिल्यांदा ६५ हजार रुपये भरले.त्यानंतर पैसे उकळण्यासाठी प्रिस्काने आपला गेम सुरू केला.

## गिरीराज सिंहांनी मुस्लिमांना दिली धमकी

**नवी दिल्ली (पीटीआय)-** वादग्रस्त वक्तव्यांसाठी प्रसिद्ध असणारे केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह यांनी राम मंदिरांच्या मुद्द्यावरून नव्या वादाला तोंड फोडले आहे. त्यांनी रा मंदिराच्या मुद्द्यावरून मुस्लीम समाजाला थेट इशाराच दिला आहे. ते रविवारी दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी म्हटले की, भारतातील मुस्लीम हे मुघलांचे नव्हे तर प्रभू रामचंद्राचे वंशज आहेत. त्यामुळे त्यांनी राम मंदिराला विरोध न करता त्याचे समर्थनच केले पाहिजे. अन्यथा देशातील हिंदू समुदाय नाराज होईल. त्यांच्या तिरस्काराचा अग्नी भडकला तर काय परिणाम होतील, हे मुस्लिमांनी लक्षात ठेवावे, असे गिरीराज सिंह यांनी म्हटले. राम मंदिराचा मुद्दा हा कर्करोगाच्या आजाराप्रमाणे झाला आहे. सध्या हा कर्करोग दुसऱ्या टप्प्यात आहे. लवकरच राम मंदिर उभारले नाही तर सर्व



परिस्थिती हाताबाहेर जाईल, असा थेट इशाराच त्यांनी दिला.देशातील अनेक भाग असे आहेत की ज्याठिकाणी आणखी २० वर्षांनी हिंदूंना ब्र देखील उच्चारता येणार नाही. हिंदूंची लोकसंख्या झपाट्याने घसरत आहे. त्यामुळे आता सर्वधर्म समभाव शिकवायचा असेल तर तो मुस्लिमांना शिकवावा.

## फेसबुक पोस्टवरुन वाद, मुंबईत काँग्रेस कार्यकर्त्यांची हत्या

**मुंबई (दयानंद पाटील)-** फेसबुक पोस्टवरुन सुरु झालेला वाद मुंबईत एकाच्या जीवावर



बेतला आहे. घाटकोपरमधील काँग्रेस कार्यकर्ते मनोज दुबे यांची हत्या करण्यात आलीय. या हत्येप्रकरणी साकीनाका पोलिसांनी भाजपच्या काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. घाटकोपरमधील असल्फा विभागात काल रात्री अडीच वाजण्याच्या सुमारास काँग्रेस कार्यकर्ते मनोज दुबे यांची हत्या झाली.काल एका युवकाने काँग्रेस आमदार नसीम खान यांच्यावर टीका करणारी पोस्ट फेसबुकवर शेअर केली. या पोस्टवरुन फेसबुकवरच वाद सुरु झाला. त्यावरुन मनोज दुबे आणि त्याच्या ग्रुपमधील काही जणांनी टीका करणाऱ्याला समजावलं. मात्र त्यांच्यातील फेसबुकवरील वाद आणखीच वाढत गेला.

## सीबीआयच्या विशेष संचालकांवर भ्रष्टाचाराचा ठपका, तीन कोटींची लाच घेतल्याचा आरोप

**नवी दिल्ली (पीटीआय)–** देशातील सर्वात मोठी तपास यंत्रणा सीबीआय सध्या एका वेगळ्याच संकटात आहे. सीबीआयने आपलेच विशेष संचालक आणि क्रमांक दोनचे अधिकारी राकेश अस्थाना यांच्यावर तीन कोटींची लाच घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाला क्रमांक एक आणि क्रमांक दोनचे अधिकारी असा वाद असल्याचंही बोललं जात आहे. सीबीआयचे टॉप बॉस आलोक वर्मा आणि अस्थाना यांच्यातील वादाची किनार या प्रकरणाला असल्याची चर्चा आहे. सीबीआयने अस्थाना



यांच्यावर दाखल केलेल्या एफआयआरनुसार, अस्थाना यांनी मांस व्यापारी मोईन कुरेशीकडून तीन कोटींची लाच घेतल्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे अस्थाना हेच कुरेशीविरोधात सुरु असलेल्या प्रकरणाचा तपास करत होते. अस्थाना यांनी स्वतःवरील आरोप फेटाळत यामध्ये आपल्याला फसवलं जात असल्याचं स्पष्टीकरण दिलं आहे.

हैदराबादमधील उद्योगपती सतीश बाबू सना यांच्या तक्रारीवरुन सीबीआयने आपल्या संस्थेतील दुसऱ्या क्रमांकाच्या अधिकाऱ्यावर लाच घेतल्याचा ठपका ठेवला आहे.

अस्थाना यांना गेल्या वर्षी जवळपास तीन कोटी रुपये दिल्याचा दावा एफआयआरमध्ये करण्यात आला आहे. सना यांचा हा दावा सीआरपीसी कलम १६४ नुसार न्यायदंडाधिकाऱ्यासमोर नोंदवण्यात आला, जो कोर्टालाही मान्य असेल. मोईन कुरेशीकडून ५० लाख रुपये घेतल्याप्रकरणी सना हे देखील चौकशीच्या घेऱ्यात होते.

# अंतर्वस्त्र बनवणाऱ्या कंपनीचे मालक हर्षद ठक्कर बेपत्ता

**मुंबई (शैलेश माहिमकर)-** अंतर्वस्त्र बनवणारी कंपनी आशापुरा इंटिमेट फॅशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष हर्षद ठक्कर मागील २० दिवसांपासून बेपत्ता आहेत. ठक्कर २ ऑक्टोबरला शेवटचे ऑफिसमध्ये दिसले होते. हर्षद ठक्कर यांच्या कुटुंबीयांनी ८ ऑक्टोबरला त्यांच्या बेपत्ता होण्याची तक्रार नोंदवली होती. महत्त्वाचं म्हणजे हर्षद यांचा मोबाईल फोन, वॉलेट आणि पासपोर्ट त्यांच्या ऑफिसमध्येच सापडला होता. तसंच तपासादरम्यान पोलिसांना गुजराती भाषेत लिहिलेलं एक पत्र सापडलं, ज्यात त्यांनी नुकसानासाठी गुंतवणूकदारांची माफी मागितली आहे.'मला कोणाकडून काहीही नको. मला कोणत्याही गोष्टीची आवश्यकता नाही आणि माझ्यासोबत काय



होणार हे देखील माहित नाही. एवढ्या लोकांच्या नुकसानासाठी मी जबाबदार आहे, या ओझ्यासह मी जगू शकत नाही,' असं त्यांनी पत्रात लिहिलं आहे. तर या नुकसानासाठी त्यांनी प्रतिस्पर्ध्यांना जबाबदार ठरवलं आहे.आशापुरा इंटिमेट फॅशन लिमिटेड ही कंपनी मागील सहा महिन्यांपासून अडचणीत होती. यादरम्यान, कंपनीच्या एकूण बाजार भांडवलात सुमारे १००० कोटी रुपयांची घसरण झाली होती. कंपनीने परिपत्रक काढून शेअरहोल्डर्सना एमडी हर्षद ठक्कर बेपत्ता झाल्याची माहिती दिली होती. तसंच कंपनीच्या प्रगतीसाठी पाऊल उचण्याची गरज असल्याचंही म्हटलं होतं. हर्षद ठक्कर बेपत्ता झाल्याची माहिती पोलिसांना दिली आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## अश्विनी बिद्रे हत्या : वस्तूंची पुन्हा फॉरेन्सिक तपासणी करणार

**कोल्हापूर-** महिला पोलीस अधिकारी अश्विनी बिद्रे हत्या प्रकरणाच्या तपासातील वस्तूंची पुन्हा खासगी फॉरेन्सिक लॅबमध्ये तपासणी केली जाणार आहे. मुंबईतील अंधेरी येथील खासगी लॅबमध्ये तपासणी केली जाणार असल्याची माहिती मिळतेय.यापूर्वी शासकीय फॉरेन्सिक लॅबमध्ये झाली होती. मात्र तपासणीत सर्व पुराव्यांची तपासणी निगेटिव्ह आल्याने पुन्हा खासगी लॅबमध्ये तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महत्त्वाचं म्हणजे, तपासणीसाठी अश्विनी बिद्रे यांच्या लहान मुलीच्या रक्ताचे नमुनेही घेण्यात येणार आहेत.१५ एप्रिल २०१६ पासून अश्विनी बिद्रे उर्फ अश्विनी राजू गोरे या नवी



मुंबईतील कळंबोलीतून बेपत्ता झाल्या होत्या. त्या बेपत्ता झाल्या नसून वरिष्ठ पोलिस अधिकारी अभय कुरुंदकर यांनी बिद्रेंना बेपत्ता केल्याचा आरोप कुटुंबाने केला होता. या तपासात पोलिस सहकार्य करत नसल्याचा आरोप सुरुवातीला अश्विनी यांच्या कुटुंबीयांनी केला होता.अश्विनी जयकुमार बिद्रे... कोल्हापूर जिल्ह्यातील आळते गावातील एक महत्त्वकांक्षी तरुणी. त्या २००० सालापासून स्पर्धा परीक्षेची तयारी करत होत्या. २००५ साली त्यांचा विवाह हातकणंगले गावातील तरुण राजू गोरे यांच्यासोबत झाला. लग्न झाल्यानंतर एकाच वर्षात अश्विनी स्पर्धा परीक्षा पास झाल्या आणि त्यांना पोलिस उपनिरिक्षक पद मिळालं.

# १० वी पास उमेदवारांसाठी सरकारी नोकरीची सुवर्ण संधी

**नवी दिल्ली-** सिक्योरिटी असिस्टेंट/एग्जीक्यूटिव या पदासाठी नोकरी करु इच्छित असाल तर तुमच्यासाठी सुवर्ण संधी आहे. इंटेलिजेंस ब्यूरो (IB) ने सिक्योरिटी असिस्टेंट/एग्जीक्यूटिव पदांसाठी भरती आणली आहे. या पदासाठी १०वी पास असणं आवश्यक आहे. एकूण १०५४ पदांसाठी ही भरती होणार आहे. या पदासाठी जास्तीत जास्त २७ वर्ष वय असले पाहिजे. SC/ST उमेदवारांसाठी ५ वर्ष आणि ओबीसी उमेदवारांसाठी ३ वर्षाची सूट आहे. अर्ज केलेल्या उमेदवारांची परीक्षेच्या माध्यमतून निवड होणार आहे. तीन टप्प्यामध्ये ही परीक्षा असणार आहे. पहिला पेपर ऑब्जेक्टिव टाईप असणार आहे. दुसरा पेपर



डिस्क्रिपटिव टाइप असणार आहे. त्यानंतर उमेदवारांच्या मुलाखती होणार आहे. यातून उमेदवाराची निवड करण्यात येणार आहे.या पदासाठी अर्ज करण्यासाठी mha.gov.in आणि ncs.gov.in या वेबसाईटला भेट द्या. ऑनलाईन पद्धतीने तुम्ही यासाठी अर्ज करु शकता. या पदासाठी अर्ज करताना खुला आणि ओबीसी वर्गासाठी ५० रुपये परीक्षा फी असणार आहे. तर एससी, एसटी, एक्स सर्विसमन आणि महिला उमेदवारांनी कोणतीही फी नाही आहे.१० नोव्हेंबर २०१८ ही अर्ज करण्याची शेवटची तारीख आहे. १३ नोव्हेंबर २०१८ ही परीक्षा फी भरण्यासाठी शेवटची तारीख असणार आहे.

## रत्नागिरीत लाचखोर कर्मचाऱ्यावर लाचलूचपत पथकाची कारवाई

**रत्नागिरी (योगेश होळंब)-** शासनमान्य शाळेतील शिक्षकाला वेतनश्रेणी देण्याच्या प्रस्तावावर सही करण्यासाठी तीन हजाराची लाच मागणाऱ्या लेखापरीक्षण कार्यालयातील कर्मचारी विलास गोपाल केळकर वय ५४, कनिष्ठ लेखापरीक्षक यांना लाचलुचपत खात्याच्या पथकाने आज दुपारी सव्वातीनच्या सुमारास लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. विलास गोपाल केळकर हे रत्नागिरीतील एक सुपरिचित नाव असल्याने हि बातमी कानावर पडताच खळबळ उडाली. या कर्मचाऱ्यापुढे जाणारी साखळी खूप महत्वाची असून यामध्ये विलास केळकर हि व्यक्ती बळीचा बकरा झाल्याची चर्चा अनेक ठिकाणी रंगली होती. रत्नागिरीत लाचलुचपत खात्याकडून सध्या धडक कारवाई करण्यात येत असून अनेक लाचखोरांना पकडण्यात या पथकाला यश आले आहे.

आज झालेल्या कारवाईतील तक्रारदार हे शासनमान्य शाळेमध्ये सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या सेवेला १४ वर्षे देखील पूर्ण झाली आहेत. वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी पात्र झाल्याने त्यांनी आपल्या शिक्षणसंस्थेकडे अर्ज केला होता व मुख्याध्यापकांच्या सहीने वेतनश्रेणी प्रस्ताव लेखाधिकार लेखापरीक्षण पथक (शिक्षण) रत्नागिरी कार्यलयात पाठविण्यात आला होता. तक्रारदार यांनी लोकसेवक विलास गोपाळ केळकर यांची भेट घेतली असता त्यांनी लेखाधिकारी यांची सही होणे बाकी असून त्याकरिता तीन हजार रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार याने याबाबत लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली असता या तक्रारीची पडताळणी करून ३ हजाराची लाच घेताना लाचलुचपत पथकाने केळकर यांना रंगेहाथ पकडले. सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील पोनी प्रवीण कदम , पोलीस निरीक्षक श्री. तळेकर, पोहवा संतोष कोळेकर, संदीप ओगले, सूपल, पोना नलावडे, हुंबरे या पथकाने केली.

## सिंधी रितीरिवाजानुसार 'दीप-वीर' घेणार सहजीवनाची शपथ

**मुंबई (कमलेश घाडी)-** अखेर अभिनेत्री दीपिका पदुकोण आणि अभिनेता रणवीर सिंग यांनी त्यांच्या लग्नाची अधिकृत घोषणा केली आहे. चाहत्यांनी,



कुटुंबियांनी आतापर्यंत दिलेल्या प्रेमाबद्दल त्यांचे आभार मानत या दोघांनीही १४ आणि १५ नोव्हेंबरला आपला विवाहसोहळा पार पडणार असल्याचं सांगितलं.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार इटलीतील लेक कोमो येथे या सेलिब्रिटी जोडीचा विवाहसोहळा पार पडणार असून, काही मोजक्या मंडळींच्या उपस्थितीतच हा विवाहसोहळा पार पडणार आहे.सिंधी विवाह पद्धतींनुसार दीपिका आणि रणवीर लग्नगाठ बांधणार असल्याचं कळत आहे. त्याशिवाय लग्नाच्या आधी दीपिकाच्या कुटुंबियांकडूनही काही रुढी- परंपरांनुसार विधी पार पडणार आहेत. दीपिका- रवीरच्या लग्नाच्या दहा दिवस आधी दीपिकाची आई बंगळुरूमध्ये नंदी पूजेचं आयोजन करणार असल्याचं कळत आहे.

# हुंड्यासाठी दोन सुनांची दीड लाखांना विक्री

**विरार (विक्रांत दिघे)-** विरारमध्ये एकाच घरातील दोन सुनांचा हुंड्यासाठी छळ करुन, सासू-सासऱ्यांनी दीड लाख रुपयांना त्यांची विक्री केल्याचा खळबळजनक घटना उघडकीस आली. दोन्ही सुना एकमेकींच्या सख्ख्या बहिणी आहेत. या दोन्ही बहिणींवर अत्याचारही करण्यात आल्याचं समोर आलं आहे. सामाजिक कार्यकर्त्या महिलांच्या पुढाकारामुळे सदर प्रकरण उघडकीस आलं आहे. याबाबत विरार पोलीस ठाण्यात सासरच्या १२ लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.विरार पश्चिमेच्या एम बी इस्टेटमधील सुमन कॉम्पलेक्समध्ये रावल कुटुंब राहतं. या कुटुंबातील संजय आणि वरुण या दोन भावांचे दोन सख्ख्या बहिणींशी १० मार्च २०१५ रोजी लग्न झालं होतं. संजय हा बिझनेसमन



आहे, तर वरुण हा सीए आहे. लग्न झाल्यानंतर सहा महिने सगळं काही सुरळीत चालंल होतं. मात्र त्यानंतर रावल कुटुंबियांनी या दोन्ही बहिणीचा हुंड्यासाठी अतोनात छळ करण्यास सुरुवात केली. दुकान टाकण्यासाठी गेल्या अडीच वर्षांपासून दोन्ही सुनांकडून पाच लाखांची मागणी करण्यात येत होती. परस्पर त्यांच्या वडिलांकडून ५ लाख घेतलेही. त्यानंतर पुन्हा ४ लाखांची मागणी केली. पण ती पूर्ण होऊ न शकल्याने त्या पीडित बहिणींचा शारीरिक, मानसिक छळ सुरु केला.

३० ऑगस्ट २०१८ रोजी विरारमधील रावल कुटुंबीय या दोन्ही सुनांना घेऊन सर्व कुटुंबासह त्यांच्या मूळगावी राजस्थान येथे घेऊन गेले. १ ते ९ सप्टेंबरपर्यंत त्यांना राजस्थानच्या सिरोहा जिल्ह्यातील पिनवाडा तालुक्यात ठेवण्यात आले. त्या ठिकाणी कुटुंबातील काहींनी त्यांचा लैंगिक, मानसिक आणि शारीरिक छळ करून, पुन्हा त्यांना तुमच्या पतीकडे विरारला जा असे सांगून विराराला एका अनोळखी इसमासोबत पाठवलं. वसईला गाडी थांबल्यानंतर त्या उतरण्याचा प्रयत्न करीत असताना त्या अनोळखी माणसाने मात्र त्यांना उतरण्यास विरोध करून मिरारोड येथे घेऊन जात होता.